"कृपया प्रसिद्धी करावी" 

# प्रेस नोट

माहिती व जन संपर्क कार्यालय
पुणे महानगरपालिका
६।४।२०२६

पुणे शहराला समृद्ध ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा आहे. शहराच्या या ऐतिहासिक व सांस्कृतिक वारशाची ओळख नागरिकांना होण्यासाठी पुणे मनपा तर्फे ऐतिहासिक स्थळभेट (हेरीटेज वॉक) चे आयोजन करण्यात आलेले आहे. सदर हेरीटेज वॉक दि११/०४/२०२६ व १२/०४/२६ शनिवार व रविवार सकाळी ७ वाजता होणार आहे. यासाठी तिकीट दर पुढीलप्रमाणे आहेत.:-

१) प्रौढांसाठी र.रु.३००/- (तीनशे) , २) उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांसाठी र.रु.२००/-(दोनशे) , ३) माध्यमिक विद्यार्थ्यांसाठी र.रु.१००/-(शंभर) , ४)परदेशी पर्यटकांना र.रु.५००/-(पाचशे) फी

नागरिकांसाठी सविस्तर माहिती व बुकिंग https://heritagewalk.pmc.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी पुणे मनपाचे सल्लगार श्री अजित वामन आपटे(९८२२३९९४६०) यांच्याशी संपर्क साधण्यात यावा.

या हेरीटेज वॉकमध्ये पुणे शहरातील शिवाजी पूल, घोरपडे घाट, शनिवार वाडा, कसबा गणपती मंदिर,लालमहाल, नानावाडा, भाऊ रंगारी निवासस्थान, ग्रामदेवता तांबडी जोगेश्वरी, दगडूशेठ गणपती मंदिर, भिडे वाडा, नगर वाचन मंदिर, बेलबाग मंदिर, महात्मा फुले मंडई, तुळशीबागवाले राम मंदिर, विश्रामबाग वाडा या वास्तूंविषयी माहिती देण्यात येणार आहे, तरी जास्तीत जास्त नागरिकांनी पुणे शहराच्या जुन्या, ऐतिहासिक वास्तू व वैभवाची माहिती करून घ्यावी हि विनंती.

कार्यकारी अभियंता
वारसा व्यवस्थापन विभाग
पुणे महानगरपालिका